# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

An ISO 9001:2008 Certified Corporation

मुख्य लेखापरीक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०२०६७३३१५२१

E-mail - audit@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

क्र. मुलेप/१अ/कावि/०८ /२०२३

दि.११ -०१-२०२३

**विषय- लेखापरीक्षणातील प्रलंबित आक्षेपांचे अनुपालनाकरीता नियमितपणे बैठकांचे आयोजन करणेबाबत. . .**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागामार्फत महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम १०५ व १०६ नुसार केल्या जाणाऱ्या लेखापरीक्षणामध्ये मोठ्या संख्येने परिच्छेद प्रलंबित आहेत. याबाबत मा.आयुक्त सो. यांनी दि. २६-१२-२०२२ रोजी मुख्यलेखापरीक्षक यांचे समवेत आढावा बैठक घेतलेली होती. तदनंतर प्रकरणी दि. २७-१२-२०२२ रोजी झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीमध्ये लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत सर्व विभागप्रमुखांना सुचना देखील दिलेल्या आहेत.

लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने सन २००५ ते २०१५ या कालावधीतील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन प्रामुख्याने होणेकरीता सर्व विभागांना मुख्य लेखापरीक्षण विभागाकडील परिपत्रक क्र. मुलेप/१अ/ कावि/१७०/२०२२, दि. २८-१२-२०२२ अन्वये माहे मार्च २०२३ अखेर उद्दीष्ट निश्चित करुन देण्यात आलेले आहे.

तथापि लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांची मोठ्या प्रमाणावर असलेली संख्या विचारात घेता लेखापरीक्षणातील परिच्छेदांचे अनुपालनाकरीता नियमितपणे पाठपुरावा होणे आवश्यक आहे. याकरीता कार्यपध्दती निश्चित करणेची बाब विचाराधीन होती.

सबब उपरोक्तप्रमाणे नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाची कार्यवाही होणेकरीता पुढीलप्रमाणे निर्देश देणेत येत आहेत:

१. लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांच्या अनुषंगाने "अंतर्गत लेखा परीक्षक" यांनी बैठकांचे आयोजन व समन्वयक म्हणुन कामकाज करणे, त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्यातील अनुपालनांची तसेच लेखापरीक्षणातील प्रलंबित परिच्छेदांची सविस्तर माहिती सादर करण्याची जबाबदारी देखील "अंतर्गत लेखा परीक्षक" यांची राहिल

२. अशा बैठकांचे आयोजन महापालिका अति.आयुक्त यांचे स्तरावर प्रत्येक महिन्यामध्ये करावे

३. वरीलप्रमाणे केलेल्या कामकाजाचा त्रैमासिक अहवाल मा.आयुक्त यांचेकडे सादर करावा

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रती,

अंतर्गत लेखा परीक्षक, लेखा विभाग

प्रत - १. अति.आयुक्त (१) / (२) / (३)    २. लेखा विभाग

३. प्रशासन विभाग    ४. सर्व विभाग

D:\TABLE-1A\Audit\Letter_A4.docx